MHKO010023412025

**विशेष खटला क्र. १३५/२०२५ चे कामी नि. ५ खालील आदेश**

प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्जदारचे कथन की, त्याचे मालकीची इंडिगो मांजा कंपनीची चारचाकी गाडी नोंदणी क्र. एमएच-०१-बीबी-३३०४ ही मुरगूड पोलीस ठाणे, गु.र.नं.११६/२०२५ मध्ये जप्त करण्यात आली आहे. जप्त वाहन अर्जदारचे मालकीचे असून ते पोलीस ठाण्यात तसेच पडून राहिल्यास त्याचे नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान होणार आहे. सदर मुद्देमाल हा अर्जदारच्या ताब्यात दिल्यास न्यायालय जेव्हा आदेश करतील त्यावेळी न्यायालयात हजर करणेस तयार आहेत. त्याचप्रमाणे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल, फेरफार करणार नाहीत किंवा त्याची विक्री अगर तबदील करणार नाहीत. तरी प्रस्तुतचा अर्ज.

३. तपासी अंमलदार यांनी (नि.५) वर म्हणणे देवून असे कथन केले की, आरोपीत यांनी सदर गुन्हयातील जखमी पिडीत सौरभ भरमा कांबळे यास वरील कारमध्ये बसवून कुरणी रोडला कॅनॉलजवळ नेवून गंभीर स्वरूपाची मारहाण केली असून सदर वाहनामध्ये बसवून नेत असताना आरोपी यांना साक्षीदार यांनी पाहिलेले आहे. त्यामुळे सदरचे वाहन हे गुन्हयातील महत्वाचा पुरावा आहे. तसेच सदरचे वाहन अर्जदारास परत केलेस त्याचे बनावटी व रंगामध्ये फरक करू शकतात . त्यामुळे ते अर्जदारला परत देण्यात येवू नये. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४.		अभियोग पक्षाने म्हणणे देवून असे कथन केले की, सदरचे वाहन आरोपींनी गुन्हयात वापरले असून सदरचे वाहन अर्जदारास परत केलेस त्यामध्ये बदल करणेची शक्यता आहे. सदरचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५.		कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारने जप्त मुद्देमाल म्हणजेच वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र व आधार कार्ड यांची पडताळणी केलेली प्रत, तसेच वाहनाची विमा पॉलीसीची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. एकंदरीतच जप्त मुद्देमाल म्हणजे चारचाकी वाहन हे अर्जदारचे नावे नोंदणीकृत असल्याचे दिसून येते.

६.		ना.सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार, ए.आय.आर. २००३ एस.सी. ६३८ या न्यायनिवाड्यामध्ये जप्त मुद्देमालाची गरज नसताना पोलीस ठाण्यात पडून ठेवू देवू नये व योग्य त्या अटी व शर्तींवर मालक किंवा संबंधितांना ते परत करावे, असे निर्देश दिलेले आहेत. सबब, जप्त वाहन अर्जदारच्या अंतरिम कब्जात देणे योग्य व संयुक्तिक होणार आहे. म्हणून मी याकामी पुढीलप्रमाणे आदेश पारित करते :-

## आदेश

१)		अर्ज मंजूर केला.

२)		गु.र.नं.११६/२०२५ चे तपासी अंमलदार, मुरगूड पोलीस ठाणे यांनी जप्त केलेला मुद्देमाल इंडिगो मांजा कंपनीची चारचाकी गाडी नोंदणी क्र. एमएच-०१-बीबी-३३०४ ही अर्जदारला अंतरिम कब्जात रक्कम रु.१,००,०००/- (रू. एक लाख मात्र) च्या सुपूर्तनाम्यावर खालील अटींवर द्यावी :-

अ)	अर्जदारने सदर जप्त मुद्देमाल हे कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करु नये किंवा नष्ट करु नये किंवा त्याचे स्वरुप बदलू नये.

ब) अर्जदारने सुपूर्तनामा तपासी अंमलदारच्या समक्ष द्यावा.

क) या न्यायालयाने आदेश केल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करावे.

ड) तपासी अंमलदारने जप्त मुद्देमाल अर्जदारचे ताब्यात देताना सविस्तर पंचनामा करुन त्याची सर्व बाजूंनी छायाचित्रे घ्यावीत आणि सुपूर्तनामा व छायाचित्रे प्रकरणात दाखल करावीत.

ई) सदर आदेशाची एक प्रत संबंधित तपासी अंमलदारास देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SAMEERA YASIN SHAIKH
Date: 2025.09.26 11:39:15 +0530

कोल्हापूर. (श्रीमती एस. वाय देशमुख)

दिनांक:२५.०९.२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, कोल्हापूर.